झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पहिला मजला ,काकडे बीझ आयकॉन ,ई ,स्क्वेअर जवळ-
शिवाजीनगर४११०१६-पुणे ,.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/२९८८/२०२५
दिनांक : ८ /१२/२०२५

झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

गट नं. १३३३, १३३४, १३५९, १३६७, १३९९, १४००/१, १४०१, १४१३, १४१४, १४१५, १४१६, १४१७, १४१९, १४२३, १४२४, १४२५, १४३०, १४४५/१, १४४६, मोरे वस्ती, भिमशक्तीनगर, चिखली येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत ; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१४/१०/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक- पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर ०५ - ११, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.११ व १२ वर तसेच स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दि.१८/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा पद्धतीने संबंधित झोपडपट्टीमध्ये प्रत्यक्ष जागेवर दि.२२/१०/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत ही शासकीय मालकीची असून दि.१४/१०/२०२४ रोजी पूर्वसूचना आदेश प्रसिध्द करतेवेळी विकसक यांनी सदर मिळकतीचा मोजणी नकाशा सादर केला नव्हता व अंतिम ३ (क) आदेश पारित करणेपूर्वी मोजणी नकाशा सादर करणेच्या अटीवर झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कलम ३ (क) पूर्वसूचना प्रसिध्द करणेत आलेली होती. याबाबत, विकसक यांनी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांचेकडील दिनांक ०७/१०/२०२५ रोजीचा मोजणी नकाशा या विभागास सादर केलेला आहे. सदर मोजणी नकाशावरुन अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र ३४०००.०० चौ.मी. इतके असलेचे दिसून येते. त्यानुसार प्राथमिक ३ (क) आदेशामध्ये याबाबत दुरुस्ती करुन अंतिम ३ (क) प्रसिध्द करणे आवश्यक वाटते. त्यामुळे कलम ३ (क) पूर्वसूचना आदेशामधील नमूद क्षेत्राऐवजी ३४०००.०० चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद करुन व मोजणी नकाशा नुसार चतु:सिमा नमूद करुन अंतिम ३ (क) आदेशामध्ये तसा बदल करणे क्रमप्राप्त आहे ; आणि

(४) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक, पुणे महानगरपालिका यांना देखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्मावण्यात आले होते आणि सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला असून अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत/तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्यासंदर्भातील दि.१४/१०/२०२४ रोजी जाहीर नोटीसीद्वारे प्रसारित केलेली पूर्वसूचना कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून सदरच्या आदेशाविरोधात ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- गट नं. १३३३, १३३४, १३५९, १३६७, १३९९, १४००/१, १४०१, १४१३, १४१४, १४१५, १४१६, १४१७, १४१९, १४२३, १४२४, १४२५, १४३०, १४४५/१, १४४६, मोरे वस्ती, भिमशक्तीनगर, चिखली, जिल्हा - पुणे

**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव- चिखली | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (त्रिमितीय पध्दतीने) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (कॅडेस्ट्रीयल नकाशानुसार) | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| गट नं. १३३३, १३३४, १३५९, १३६७, १३९९, १४००/१, १४०१, १४१३, १४१४, १४१५, १४१६, १४१७, १४१९, १४२३, १४२४, १४२५, १४३०, १४४५/१, १४४६. | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | ३४०००.०० चौ.मी. | गट नं. १३९९ पै (नभुक्र.३०पै), १३६७ पै (नभुक्र.३६पै), १३५९ पै (नभुक्र.३७पै), १३३४ पै (नभुक्र.३८पै), १३३३पै (नभुक्र.३९) | गट नं. १४३० पै (नभुक्र.१५पै), १४२३ पै (नभुक्र.१८पै), १४१९ पै (नभुक्र.२२पै), १४१७ पै (नभुक्र.२३पै), १४१६ पै (नभुक्र.२४पै), १४१५ पै (नभुक्र.२५पै), १४१४ पै (नभुक्र.२६पै), १४१३ पै (नभुक्र.२७पै), १४०१ पै (नभुक्र.२८पै), १४०० पै (नभुक्र.२९पै), १३९९ पै (नभुक्र.३०पै), रस्ता. | गट नं. १४४६ पै (नभुक्र.१२पै) १४४५ पै (नभुक्र.१३पै) | गट नं. १४४५ पै (नभुक्र.१३पै), १४३० पै (नभुक्र.१५पै), १४२५ पै (नभुक्र.१६पै), १४१९पै (नभुक्र.२२पै), १४१७ पै (नभुक्र.२३पै), १४१५ पै (नभुक्र.२५पै), १४१४ पै (नभुक्र.२६पै), १४१३ पै (नभुक्र.२७पै), १४०१ पै (नभुक्र.२८पै), १४०० पै (नभुक्र.२९पै), १३९९ पै (नभुक्र.३०पै), १३६७ पै (नभुक्र.३६पै) व रस्ता. |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ८ / १२ /२०२५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

८/१२/२५

(सतीशकुमार खडके) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. ताबा विभाग, झो.पु.प्रा., पुणे - यांसकडे माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा सदर अंतिम आदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.